# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/02/2024 (गुरूवार) सकाळ

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. सावनेर :— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे अप क्र. ८१४/१९ कलम ३७६, ३७६(३) भादवी सहकलम ४, ५ (जे)(२) ५ एल ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादीची अल्पवयीन पिडीत मुलीला आरोपी नामे— बळीराम तुळशिराम इरपाची, वय ४५ वर्ष, रा. शेरहीता सावनेर जि. नागपुर याने पिडीतेच्या घरी कोणीही नसताना घरी येवुन वेळोवेळी शारिरीक संबंध प्रस्थापित केले. पिडीतेला रक्ताची कमी असल्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे उपचाराकरीता आणले असता डॉक्टरांनी सोनोग्राफी करून सांगीतले की पिडीता ही ०६ महिण्याची गर्भवती आहे.

सदर प्रकरणाचे तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक सोनाली रासकर मॅडम यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश मा. श्री. ओ.पी. जयस्वाल सो. जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक २२/०२/२०२४ रोजी अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश मा. श्री. ओ.पी. जयस्वाल सो. जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ४ पोक्सो मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व २०००/—रू. दंड ,दंड न भरल्यास ३ महीने सश्रम कारावास तसेच कलम ६ पोक्सो मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व २०००/—रू. दंड दंड न भरल्यास ३ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी खापर्डे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा मधुकर आदमने पो. स्टे. सावनेर यांनी मदत केली आहे.

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपींना अटक
### नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

पो.स्टे. मौदा :— दिनांक २२/०२/२०२४ रोजी रात्री दरम्यान पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ पो. स्टे. मौदा तसेच उपविभाग कन्हान हद्दीत स्टाफसह विभागीय गस्त पेट्रोलिंग करित असताना भंडारा कडुन नागपूरकडे NH-53 रोड मार्गाने लहान चार चाकी मालवाहक वाहना मधून अवैधरित्या गोवंशिय जनावरांची कत्तली करिता वाहतूक होत आहे. अशी गुप्त माहिती मिळाल्याने NH-५३ रोडवरील मौजा मौदा शिवारात रबडीवाला टी पॉईट तसेच वडोदा शिवारात स्टाफचे मदतीने नाकाबंदी केली असता १) बोलेरो पिकअप क्र. MH-40/DL-9841 चा चालक आरोपी नामे—**खेमराज मेकचंद टेकाम, वय ४० वर्ष, रा. चंघेरा ता. जि. गोंदीया** व **क्लीनर नविन राजकुमार दखनवार, वय २४ रा. चंघेरा रा. गोंदीया** याने आपल्या वाहनामध्ये १२ गोवंश (त्यापैकी ०४ गायी, ८ गोऱ्या) २) बोलेरो पिकअप क्र. MH-49/BZ-7385 चा चालक आरोपी नामे— **रूपेश लेकचंद लांजेवार , वय २४ वर्ष वार्ड न ं.६ लाखनी जि. भंडारा** मध्ये १२ गोवंश (०६ गायी, ०६ गोरे) ३) बोलेरो पिकअप क्र. MH-39/C-6768 चा चालक आरोपी **हितेश रेवाराम भोतमांगे वय २४ वर्ष, रा. आमगाव दिघोरी ता. जि. भंडारा** मध्ये १२ गोवंश (०६ गायी ०६ गोरे) असे एकूण तीन वाहने व त्यामधील एकूण ३६ गोवंशिय जनावरे असा एकूण १६,६०,०००/— रु. चा मुद्देमाल जनावरे हे कत्तली करीता

निर्दयतेने, अवैध्यरित्या, क्रुरतेने बांधून व वाहनामध्ये कोंबून मिळून आले. यातील **आरोपी नामे– १) खेमराज मेकचंद टेकाम, वय ४० वर्ष, रा. चंघेरा ता. जि. गोंदीया २) क्लीनर नविन राजकुमार दखनवार, वय २४ रा. चंघेरा रा. गोंदीया ३) हितेश रेवाराम भोतमांगे वय २४ वर्ष, रा. आमगाव दिघोरी ता. जि. भंडारा ४) रूपेश लेकचंद लांजेवार , वय २४ वर्ष वार्ड न ं.६ लाखनी जि. भंडारा** तिन्ही वाहनावरील आरोपीतांना ताब्यात घेऊन अवैधरीत्या गोवंशाची वाहतूक करणारे वाहन चालक/मालक तसेच फरार आरोपीतांविरुद्ध कलम ११(१)(घ)(ड)(च) प्रा. छ. प्रति. अधि. सहकलम ५ (१) (अ ), ९ म. प्रा. सं अधि. सहकलम २७९, ३४ भादंवी सहकलम १८४ मो. वा. का. अन्वये पो. स्टे. मौदा येथे गुन्हे नोंद करण्यात आलेले आहे.

सदरची कार्यवाही ही श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण नागपूर श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतिशसिंग राजपूत, पोहवा भास्कर मेटकर, चालक पोलीस अंमलदार देवांगण, पोशि अतुल निंबार्ते, पोशि प्रदीप खिल्लारे, तेजस राऊत यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर